# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि. ०७/११/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१४) इतिवृत्त**

**मंगळवार** दिनांक **०७ नोव्हेंबर २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस प्र.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
2. श्री. गायकवाड दिलीप नारायण
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
5. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
6. श्री. मो. जावेद मो. इसाक
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

सौ.लता दलाल : मालमत्ता कर वसुलीचा महत्वाचा मुद्दा आहे. त्यासंबंधी माहिती मिळावी. मार्च संपल्यानंतर नोव्हेंबर 2006 अखेरपर्यंत मालमत्ता कराची वसुली किती झाली, वसुली कमी झाली असेल तर त्याची कारणे काय आहेत?

मा. सभापती : कर निर्धारक व संकलक श्री.फड यांनी खुलासा करावा.

कर निर्धा.व संकलक : सन 2006-07 या वर्षासाठी सर्वसाधारण सभेने 40 कोटींचे उद्दीष्ट दिलेले असून 7 महिन्यात 4.26 कोटी वसूली झालेली आहे.

सौ.लता दलाल : वसुली फक्त 10 टक्के झालेली दिसते. वसूली न होण्याची कारणे काय आहेत?

कर निर्धा.व संकलक : ऑक्टोबर नंतर 6 महिन्यात वसूली जास्त होते. वसूली निश्चित वाढेल. आस्थापना विभागाकडे वसूलीसाठी जास्त कर्मचाऱ्यांची मागणी केली होती.

सौ.लता दलाल : संबंधीत विभागाची आस्थापनाकडे मागणी आलेली आहे का? जर वसूली होणार नसेल तर विकास कामे कसे होतील.

उप आयुक्त(म) : करमुल्य निर्धारक व संकलक यांनी अतिरिक्त 100 कर्मचाऱ्यांची मागणी केली. या संदर्भात मा.सभापती, स्थायी समिती, करमुल्य निर्धारक व संकलक यांचेसह चर्चा केली. 100 कर्मचारी मुख्य कार्यालयाकडून देणे शक्य नाही. तरी काही ठिकाणी जसे लेखा परीक्षण विभाग व इतर विभागातील काही कर्मचारी कमी करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सौ. लता दलाल : जकात विभागाचे खाजगीकरण झाल्यामुळे तेथील कर्मचारी कर वसुलीकडे द्यावेत. वसुली का थांबली, फक्त 10 टक्के वसूली झाली. 40 कोटींचे उद्दीष्ट ठेवण्यात आलेले आहे. उर्वरीत 6 महिन्यात 36 कोटी कसे वसुल करणार? सभागृहाची दिशाभूल होत आहे.

कर निर्धा.व संकलक : मा.सभापती, स्थायी समिती यांनी वसुलीचा आढावा घेण्याच्या संदर्भात बैठक घेतलेली आहे. त्यानंतर मी प्रभाग अधिकाऱ्यांची बैठक घेतली व त्यानंतर मा.आयुक्तांनी 1 तारखेला या संदर्भात बैठक घेतली. यामध्ये वसूलीच्या संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मा. सभापती : माझ्या दालनात वसूलीच्या संदर्भात बैठक झाली होती. त्यामध्ये वसुलीच्या संदर्भात ज्या सूचना देण्यात आल्या होत्या त्यावर काय कार्यवाही झाली?

कर निर्धा.व संकलक : सूचनांच्या संदर्भात प्रस्ताव देण्यात येत आहे.

श्री.संजय शिरसाट : मागील सात महिन्यात मालमत्ता कराच्या साध्या मागणी नोटीसा देखील पाठविण्यात आलेल्या नाहीत. चुकीची कारणे दाखवतात. एका वॉर्डाचे साफसफाईचे खाजगीकरण देखील झाले. कर्मचारी देण्यात येणार होते. आता डिसेंबर येणार आहे त्यात सुधारीत अर्थसंकल्प सादर होईल. यावर्षीचा अर्थसंकल्प समजणे अवघड आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली फक्त 10 टक्के, ही 10 टक्के वसूली घरमालकाकडून वसूल झालेली नाही. या वसुलीमध्ये नवीन कर आकारणी झाली अशा नवीन मालमत्ता कर आकारणीमधून किती रक्कम वसूल झाली.

कर निर्धा.व संकलक : मालमत्ता कराच्या मागणी 20 हजार मागणी नोटीसा आज तयार आहेत. त्या प्रभाग कार्यालयास तात्काळ देणार आहोत. यापुर्वी मालमत्ता कराच्या मागणी नोटीसा 30 हजार दिलेल्या आहेत.

श्री.संजय शिरसाट : 1 लाख 20 हजार मालमत्ता असून अद्याप एकही मागणी नोटीस देण्यात आलेली नाही.

सौ.लता दलाल : सहा महिने संपत आले अद्याप मागणी नोटीसा दिल्या नाही. 1 लाख 20 हजार मालमत्तेमधून फक्त 30 हजार मगणी नोटीसा प्रभाग अधिकारी यांच्याकडे आहेत. सहा महिन्यात एवढीच वसूली झाली. मा.सभापती, स्थायी समिती, मा.आयुक्तांनी या संदर्भात बैठक बोलावली.

कर निर्धा.व संकलक : मा.सभापती, स्थायी समिती यांच्याकडे जी बैठक झाली त्यात प्रत्येक तीन महिन्याला मागणी नोटीस देण्याचे ठरले. तसेच कर निरीक्षक वाढवायचे ठरले.

सौ.लता दलाल : अर्थसंकल्पात 40 कोटीचे उद्दीष्ट ठेवतांना त्यावेळी का सांगण्यात आले नाही? शहरातील मोठ्या हॉटेल्स, इमारती त्यांना मालमत्ता कर आकारणी झालेली नाही.

मा. आयुक्त : वसुलीच्या संदर्भात रास्त मुद्दा उपस्थित केला. गांभीर्याने घेण्यासारखी बाब आहे. मा.सभापती, स्थायी समिती यांनी बैठक घेतली त्या लागोपाठ मी देखील बैठक घेतली. टप्प्याटप्प्याने काम व्हावे. मालमत्ता कराची मागणी नोटीस गेल्यानंतर ज्यांना मालमत्ता कर भरण्याची इच्छा आहे असे लोक ताबडतोब भरतात. मालमत्ता कराची मागणी सूचना जायला हवी. या संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मागील वर्षाच्या ज्या मागणी नोटीसा आहेत त्यावरून स्वतः तयार करून देण्याच्या देखील सूचना देण्यात आलेल्या आहेत. नोटीसा देणे आवश्यक आहे. 30 हजार लोकांवर नोटीसा बजावणे देखील आवश्यक आहे. हे काम करण्यात येईल. या संदर्भात संगणकात सॉफ्टवेअर काय आहे ते पहावे. मागील वर्षीच्या मागणी प्रमाणे वसुली करण्यास हरकत नाही. 10 टक्क्यापेक्षा जास्त परंतु योग्य प्रमाणात व्हावे. कर्मचारी वृंद व नोटीसाच्या संदर्भात खबरदारी घेण्यात येईल. उप आयुक्त(म) यांच्याशी बोलून 8 दिवसात नोटीसा बजावल्या जातील. अशा सूचना दिल्या. या महिन्याच्या अखेरपर्यंत नोटीसा तामील व्हायला पाहिजे.

श्री.संजय शिरसाट : 210 कोटीचे बजेट होते, ते फुगवून 273 कोटीचा आकडा झाला. 10-20 कोटी वसूल होतील, बाकीचे आपण कोठून आणणार? या महानगरपालिकेत पालिका आयुक्त म्हणून श्री.विजयकुमार तीन दिवसांसाठी येऊन गेले. या दिवसांत त्यांनी काम करून गेले. आमच्या कर्मचाऱ्यांना चालना द्यायला पाहिजे. येणाऱ्या स्थायी समिती सभेपर्यंत माहिती दिली तर बरे होईल.

मा. आयुक्त : मी आपल्या मताशी सहमत आहे. लवकरात लवकर वसुलीचा प्रयत्न करण्यात येईल. नवीन मालमत्ता समाविष्ट करणे बाबत देखील चर्चा झाली आहे. कर्मचारी, अधिकाऱ्यांना कामाला लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

श्री.हिंमतराव दाभाडे : सर्व्हे नं.6 मुथीयान कॉर्नर येथील अनधिकृत बांधकामाचे संदर्भात अनेक वेळा प्रश्न विचारलेला आहे. परंतु त्याकडे दुर्लक्ष होते. माहितीच्या अधिकाराखाली श्री.घोरपडे यांना दिलेल्या बांधकाम परवानगी संदर्भात माहिती विचारली होती. मला पत्र देण्यात आले की, बांधकाम परवानगी दिली नाही. जर बांधकाम परवानगी दिली नसेल तर बांधकाम कशाच्या आधारावर करण्यात येत आहे? कालच त्यांनी जोमाने काम सुरू केले ते त्वरीत थांबवावे. स्थायी समितीमध्ये ठराव मांडला होता त्यात देखील अनेक तृट्या आहेत. श्री.माधवराव घोरपडे यांनी खुल्या जागेमध्ये पी.आर.कार्ड बनवून घेतले. ते बनवता येतात का? कोणी बनवून दिले, त्या ठरावात घोरपडे यांच्या नावाचा उल्लेख नाही. अर्जदाराने जागा मागीतली म्हणून दिली. त्यावेळेस जो कोणी अधिकारी होता त्याला निलंबीत करावे. आजही बांधकाम चालू आहे. श्री.निकम, प्रशासकीय अधिकारी त्या ठिकाणी जातात व डोळेझाक करून परत येतात. अनधिकृत बांधकाम थांबवावे.

उप आयुक्त(म) : श्री.माधव तुळशीराम घोरपडे यांना सदरची जागा 1999 ला स्थायी समितीच्या मंजुरीने दिली. नगर रचना विभागाची टिप्पणी आहे. तुळशीराम गंगाराम घोरपडे यांना दि.12-5-2006 रोजी बांधकाम परवानगी दिली आहे. बांधकाम परवानगीनुसार काम चालू आहे का, काम चालू असल्याचा आढावा घेतल्यानंतर दिसून येते. ही जागा खुली जागा आहे किंवा कसे ही बाब न्यायप्रविष्ट आहे. मागील सभेत खुलासा करण्यात आला होता. सि.स.नं.16911/1/A/1/1 व 16925/20 हे न्यायप्रविष्ट आहेत. बांधकाम परवानगी क्र.894 दि.12-5-2006 हे नगर रचना विभागाकडून आणले. मागील सर्वसाधारण सभेमध्ये खुलासा केलेला होता. या जागेच्या संदर्भात एक तर बांधकाम परवानगी आणि जागा अलॉटमेंट रद्द करावे लागेल.

श्री.संजय शिरसाट : ज्या मिळकतीवर स्थगिती आदेश आहे ती मिळकत वेगळी आहे. व त्यांना नोटीस दिली की बांधकाम थांबवण्यात यावे. त्या सिटी सर्व्हे क्रमांकाप्रमाणे मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत.

उप आयुक्त(म) : नगर रचना विभागाकडून जो खुलासा पत्र प्राप्त झाले. त्यानुसार सदर व्यक्तीस स्थायी समितीची परवानगी आहे. 12-5-2006 ला बांधकाम परवानगी दिली. या दोन्ही बाबी उप आयुक्त(म) यांच्या अखत्यारीत नाही. जोपर्यंत रद्द होत नाही तोपर्यंत कारवाई करता येणार नाही.

विधी सल्लागार : न्यायालयीन याचिकेमध्ये महानगरपालिकेने वेळोवेळी ठराव घेवून खुली जागा कमी केली. मा.उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे. न.भू.क्र.16925/20 वर बांधकाम परवानगी दिली ती बंद करावी. माधव तुळशीराम घोरपडे या नांवाचा त्यात उल्लेख नाही. बांध.परवानगी संदर्भात माधव तुळशीराम घोरपडे यांना दि.26-5-2005 रोजी सि.स.नं.16911/1/A/1/1 प्रमाणे बांधकाम परवानगी दिली. न्यायप्रविष्ट प्रकरणाच्या

संदर्भात श्री.घोरपडे यांना दिलेली परवानगी ही खुल्या जागेवर आहे किंवा त्या व्यतिरिक्त आहे हे नगर रचना विभागाने सांगावे.

श्री.संजय शिरसाट : मा.उच्च न्यायालयात असलेल्या प्रकरणात स्थगिती आदेशाची प्रत घेऊन तपासणी करावी. सिटी सर्व्हे नंबर हा वेगवेगळ्या भागातील आहे. कारण त्यांना नोटीस दिल्यानंतर त्यांनी बांधकाम परवानगी दाखवली. आपण त्यांना मोबदला दिलेला आहे, या संदर्भात आपणआपले अभिलेख तपासावे. या जागेच्या संदर्भात स्पष्ट खुलासा व टिप्पणी पुढील सभेत देण्यात यावी.

मा. सभापती : या प्रकरणाच्या मुख्य बाबी स.सदस्यांच्या लक्षात येतात. परंतु प्रशासनाच्या लक्षात का येत नाही. नगर भूमापन क्रमांक कोणता आहे, आपण त्यांना मोदबला दिला का, या संदर्भात उप आयुक्त(म), सहाय्यक संचालक नगर रचना व या प्रकरणात संबंधीत असलेल्या इतर अधिकाऱ्यांनी ही बैठक संपल्यानंतर उप आयुक्त यांच्या दालनात बसून तपासणी करावी व पुढील सभेपर्यंत हे प्रकरण संपवावे.

सौ.लता दलाल : अनेक रस्त्यांवर अतिक्रमण होत आहे. या संदर्भात स.सदस्यांनी तक्रार करून देखील हटविले जात नाही. अतिक्रमण विभागाला सांगितले तर ते नगर रचना विभागाकडे व नगर रचना विभागाला विचारणा केली तर ते म्हणतात शोधावी लागेल. रस्त्यावर गॅरेज आहे त्यामुळे रहदारीस अडथळा होतो. 20 वेळेस मी स्वत: तक्रार केली. भडकलगेट, सांस्कृतिक मंडळ या रस्त्यावर गॅरेजसमोर सतत दोन-तीन गाड्या उभ्या असतात.

मा. सभापती : अतिक्रमण हटविण्याबाबत का कारवाई झाली नाही?

श्री.संजय शिरसाट : दोन महिन्यापुर्वी अतिक्रमण हटविण्याचे काम जोरात सुरू झाले. मध्येच कारवाई थांबली. ही कारवाई थांबण्याचे कारण असे सांगण्यात येते की, उप आयुक्त(म) यांची बदली झाली व आता बदली रद्द झाली असावी. आजच त्यांनी वृत्तपत्राला स्टेटमेंट दिलेलेआहे.

सौ.लता दलाल : नागेश्वरवाडी पुलाजवळ अतिक्रमणा संदर्भात स्थगिती आदेश उठलेला आहे. का कारवाई झाली नाही?

श्री.रविकांत गवळी : सिडको भागातील अतिक्रमणे कुणी काढायचे.

मा. सभापती : उप आयुक्त(म) यांनी खुलासा करावा.

उप आयुक्त(म) : भडकलगेट जवळील जी तक्रार आहे ती वस्तुस्थिती आहे. यापुर्वी तीन-चार वेळा कारवाई केली. आज दुपारी पुन्हा क्रेन लावून कारवाई करण्यात येईल. वाहन मनपात जमा करण्यात येईल. सिडको हस्तांतरणानंतर खुल्या जागेचे व्हिडिओ चित्रिकरण करून बोर्ड लावण्याची कार्यवाही सुरू आहे. जागा ताब्यात घेतल्या. काही ठिकाणी कुंपण भिंती नाही, ते प्रस्तावित करण्यात येत आहे. नोगश्वरवाडी पुलाजवळील सारस्वत बँकेसमोरील प्रकरणाची कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर संचिका या विभागात आली नाही. रस्ते विभागाकडून आली नाही.

सौ.लता दलाल : परत स्थगिती आदेश आल्यावर कारवाई ठप्प होवून जाईल.

मा. सभापती : अशा प्रकरणात आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलण्यापेक्षा संयुक्तीकरित्या कार्यवाही अपेक्षित आहे.

श्री.त्रिंबक तुपे : प्रभाग अधिकारी अतिक्रमणाबाबत जबाबदार आहेत असे बोलण्यात येते. त्यांना जबाबदारी दिली का? किंवा त्यांची जबाबदारी ठरली का?

उप आयुक्त(म) : जून पासून रस्त्यावरील अतिक्रमण काढणे वेगाने सुरू केले. त्यावेळी ठरले. या कामात अडचण होऊ नये म्हणून प्रभाग अधिकारी यांच्याकडे जबाबदारी दिली.

त्यांच्याकडे योग्य यंत्रणा आहे. त्यांचेकडून होत नसेल तर प्रशासकीय अधिकारी यांना सांगावे. त्यांनी आतापर्यंत प्रशासकीय अधिकारी यांना सांगितले नाही.

मा. सभापती : हे अतिक्रमण हटाव पथकाचे असून प्रशासकीयअधिकारी यांच्यावर पूर्णपणे जबाबदारी राहिल.

श्री.दिलीप गायकवाड : दोन-तीन दिवसांपासून पाणी आले नाही, पाणी पुरवठा कधी सुरू होईल.

शहर अभियंता : पाणी वाढवण्यासाठी वेगवेगळी कामे करत आहोत. उद्या सकाळी पाणी पुरवठा सुरळीत होईल.

श्री. संजय शिरसाट : जाहिरात फलकाचे नियोजन करण्यासाठी जाहीरात फलक कुठे व कसे लावावेत, त्याचे दर काय असावेत, एजन्सीधारक श्री. टंडन यांना 8 लाख रूपये देवून दीड ते दोन कोटी उत्पन्न होईल संदर्भात निविदा काढण्यात आल्या होत्या. सेल ॲडस् यांनील 20-22 लाख रूपये मनपात भरले. त्यांचा काय वाद झाला ते न्यायालयात प्रकरण गेले. गेल्या दोन वर्षापासून स्थगिती आहे का जैसे थे आदेश आहेत ते कळत नाही. सेल ॲडस् यांनी जाहीरात फलकाचा परस्पर करारनामा करत आहे. आताही त्यांची जाहीरात चालू आहे. परंतु महानगरपालिकेस उत्पन्न नाही. गेल्या वर्षात जाहीरातीपासून किती उत्पन्न मिळाले? व सेल ॲडस् कडून किती मिळाले?अलिकेडे दिशा कन्स्ट्रक्शन यांनी बन्सीलालनगरच्या रस्त्यावरील प्रत्येक पोलवर जाहीरात बोर्ड लावले. त्यांनी एजन्सीला पैसे दिले. महानगरपालिकेला उत्पन्न नाही. होर्डीग्ज संदर्भात विना परवानगी लावण्यात येते. अनेक चौकात वेगवेगळे फोटो लावण्यात येतात. या संदर्भात मालमत्ता विभाग आणि उप आयुक्त(म) यांनी काय कारवाई केली?

उप आयुक्त(म) : जाहीरात फलकाच्या संदर्भात सेल ॲड यांच्या बरोबर 2003 मध्ये करार झाला. सदर एजन्सीने 71 ठिकाणी व मुख्य रस्त्यावर साईन बोर्ड लावले. पैसे वेळेवर भरले नाही. 2004 मध्ये त्यांचा करार रद्द केला. जिल्हा न्यायालयात महानगरपालिकेतर्फे निर्णय लागला. 57 लाख भरायचे होते. सदर एजन्सी मा.उच्च न्यायालयात गेली. 13 सप्टेबर 2005 ला प्रमुख ठिकाणचे 12 जाहीरात फलक काढले. दुसऱ्या दिवशी जैसे थे परिस्थितीचे आदेश झाले. मा.न्यायालयाने निवृत्त न्यायमुर्ती यांची नियुक्ती केली. आता निवृत्त न्यायमुर्ती श्री.चपळगांवकर यांच्याकडे प्रकरण चालू आहे. 10 लाख रूपये न्यायालयात जमा केले. मा.सभापती यांच्याकडे चर्चा झाली. स्टेटस्को आहे. नवीन फ्लेक्स काढावे असे ठरले. कालच 5 प्रमुख फ्लेक्स काढले. न्यायालयात 10 लाख रूपये जमा आहेत व गेल्या वर्षी 42 लाख रूपये मिळाले.

श्री. संजय शिरसाट : या संदर्भात मा.न्यायालयाचा अवमान झाल्याबद्दल मा.उच्च न्यायालयात का गेलो नाही? विशाल एजन्सीवर गुन्हा का दाखल केला नाही?

उप आयुक्त(म) : सेल ॲड च्या बाबतीत कालच मा.न्यायालयाच्या अवमाना संदर्भात कार्यवाही केली.

श्री.हिंमतराव दाभाडे : वॉर्डात वेगवेगळ्या ठेकेदारांना विद्युत कामे दिलेली आहेत. प्रत्येक वॉर्डात गुत्तेदार 2-4 लाईट चालू करतात. वॉर्डात किती दिवे चालू आहेत, किती बंद आहेत याची त्यांना माहिती नसते. 1-2 दिवे लावून जातात त्यामुळे गैरसोय होते. म्हणून अशा पध्दतीने ठेका देण्याचा अर्थ राहात नाही. विद्युत ठेकेदारांनी किती काम केले व त्यांना आपण किती रक्कम अदा केली? या संदर्भात खुलासा व्हावा.

मा. सभापती : विद्युत देखभालीची कामे गांभीर्याने करणे गरजेचे आहे व ज्या प्रभागात काम करण्याची गरज आहे त्याची नोंद घेण्यात यावी व लक्षपुर्वक कामे करण्यात यावीत.

सौ.लता दलाल : शहरातील अनेक हॉटेल्समध्ये सिलेंडर्सचा वापर होतो. महानगरपालिकेची एनओसी घेतली आहे का, पुढच्या बैठकीत माहिती द्यावी.

मा. सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी पुढच्या बैठकीत माहितीसह हजर राहावे.

**विषय क्र.146 :**

दिनांक 16/10/2006 रोजी तहकूब झालेल्या व **19/10/2006**(का.प.क्र.13) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक 16/10/2006 रोजी तहकूब झालेल्या व 19/10/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.147 :** (दि.22-9-2006 रोजीच्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव - विषय क्र.**108** )

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री इत्यादींचा जहीर लिलाव दि.५.८.२००६ रोजे, यांत्रिकी कार्यशाळा महानगरपालिका औरंगाबाद येथे बोली पध्दतीने करण्यात आला. जहीर लिलाव करण्याबाबतची नोटीस दै. लोकमत, सामना, सकाळ, औरंगाबाद टाईम्स् या वर्तमान पत्रात देण्यात आली. जहीर लिलावासंबंधी निर्णय घेणेसाठी खालील अधिकारी व स. स्थायी समितीच्या तीन सदस्यांची लिलाव कमिटी स्थापन करण्यात आली.

१) शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद.
२) अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद.
३) उप आयुक्त (प्रशासन), महानगरपालिका औरंगाबाद.
४) मुख्यलेखापरिक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.
५) मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.
६) उप अभियंता (यांत्रिकी), महानगरपालिका औरंगाबाद.
७) मेकॅनिकल इंजिनियर एस.टी. कार्यशाळा, औरंगाबाद
८) आर.टी.ओ. निरिक्षक, औरंगाबाद.
९) डॉ. आशा उत्तमराव बिनवडे, सदस्य स्थायी समिती.
१०)श्री. कावडे साहेबराव राणुबा, सदस्य स्थायी समिती.
११) श्री. मोहम्मद जवेद मो. इसाक, सदस्य स्थायी समिती.

अपरिहार्य कारणामुळे अ.क्र.३,४,७,८ हे सदस्य लिलावासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. बाकी सर्व सदस्य या प्रक्रियेत स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधीसह उपस्थित होते. एकूण १४६ बोलीदारांनी रू.१०,००० /- अनामत रकमेचा भरणा करून लिलावात भाग घेतला. यापूर्वीचे ऑक्शन कमिटीने दि. ९.१२.२००५ रोजे ठरविलेल्या किमतीचा लिफ़ाफ़ा सर्व कमिटी मेंबर्ससमोर उघडण्यात आला. जुने टायर्स, भंगार पार्टस्, रिकामे ऑईल ड्रम, जळालेले ऑईल ड्रममध्ये वाढ झाल्यामुळे त्याची किंमत ठरविण्यात आली. महानगरपालिकेने प्रत्येक ॲटमसाठी खालीलप्रमाणे किंमत काढली.

| अ.क्र. | विवरण | मॉडेल वर्ष | ठरविलेली किंमत |
|---|---|---|---|
| १ | एम.टी.बी. /४३४८ ट्रॉली | १९८१ | १५,००० /- |
| २ | एम.डब्ल्यु.बी./ ४०६ ट्रॉली | १९८१ | १८,०००/- |
| ३ | एम.एक्स व्ही/५२६७ महेंद्रा ट्रॅक्टर | १९८२ | ४०,००० /- |
| ४ | एम.डब्ल्यु. पी./ ७४१ ट्रॅक्टर ट्रॉली | १९८३ | २०,००० /- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | एम.डब्ल्यु.पी./ १४७८ पी. ६ ट्रक | १९८३ | ३०,००० /- |
| ६ | एम.डब्ल्यु. पी./ १७५९ टँकर ट्रॉली | १९८४ | १७,०००/- |
| ७ | एम.ए.ए. /३०८ महेंद्रा जीप | १९८५ | २०,०००/- |
| ८ | एम.एक्स .व्ही. /५७८४ महिंद्रा ट्रॅक्टर | १९८६ | २०,००० /- |
| ९ | एम.एक्स .व्ही. /५४८८महिंद्रा ट्रॅक्टर | १९८६ | ३०,००० /- |
| १० | एम.व्ही.जे./८२११ महिंद्रा जेप | १९८८ | २०,००० /- |
| ११ | एम.एफ.यु./९९३० महिंद्रा जेप | १९८८ | ३५,०००/- |
| १२ | एम.व्ही.जे /९३५३ महिंद्रा जेप | १९८९ | ५०,०००/- |
| १३ | एम.एच.२० ए /२१३८ टाटा १२१० हाय.लॅडर | १९८३ | लिलावातून वगळले |
| १४ | एम.एच. २० ई /८०७८ महिंद्रा जेप | १९९२ | लिलावातून वगळले |
| १५ | एम.एच.२० ई /९१५८ महिंद्रा जेप | १९९४ | ५०,००० /- |
| १६ | एम.एच.२० ई /३१०० अँम्बेसिडर कार | १९९५ | ७,०००/- |
| १७ | एम.एच.२० ई /३२०० अँम्बेसिडर कार | १९९५ | ७,००० /- |
| १८ | एम.एच.२० ई / ९१११ अँम्बेसिडर कार | १९९५ | ७,००० /- |
| १९ | जुने निरूपयोगी टायर्स ७९८ नग | | ४१,९३०/- |
| २० | जुने भंगार सामान १३.९९ टन , रू. ८००० /- प्रतिटन | | १,११,९२० /- |
| २१ | ऑईलचे रिकामे बॅरल २०० नग ,२२५ /- प्रतिनग | | ४५,०००/- |
| २२ | जुने जळालेले ऑईल ५९ नग रू.१५०० /- प्रति बॅरल | | ८८,५०० /- |

वरीलपैकी अॅटम क्र. १३ व १४ चा फ़ेरवापर करणे असल्यामुळे त्यास लिलावातून वगळण्यात आले. अॅटम क्र. ३,१०,१२ ची किंमत मनपाने काढलेल्या किमतीपेक्षा कमी आल्यामुळे या अॅटमचा लिलाव नामंजूर करण्यात आला. इतर एकूण १७ अॅटमचा लिलाव बोली पध्दतीने करण्यात आला. त्यामध्ये खालीलप्रमाणे किमती आल्या.

| अॅटम क्र. | विवरण | जस्तीची बोली बोलणाऱ्याचे नांव | मनपाने काढलेली किंमत | बोलीमध्ये आलेली किंमत | वॅट टॅक्स | एकूण भरून घ्यावयाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.टी.बी. /४३४८ ट्रॉली | श्री. प्रकाश जैस्वाल औ.बाद | १५,००० /- | ३२,००० | ४००० | ३६,००० |
| २ | एम.डब्ल्यु.बी./ ४०६ टु व्हीलर | श्री. सलिम खाँन अमीर खाँन, परभणी | १८,०००/- | २०,७०० | २५८७ | २३,२८७ |
| ३ | एम.डब्ल्यु. पी./ ७४१ ट्रॅक्टर ट्रॉली | श्री. अब्दुल खुद्दुस गुलाम मुस्तफ़ा औ.बाद | २०,०००/- | ४३,२०० | ५४०० | ४८,६०० |
| ४ | एम.डब्ल्यु.पी./ १४७८ पी. ६ ट्रक | श्री. युनुसभाई चाँदभाई कोटलारोड अहमदनगर | ३०,०००/- | ९१,००० | ११३७५ | १,०२,३१५ |
| ५ | एम.डब्ल्यु. पी./ | समर्थ ट्रेडर्स | १७,०००/- | ५०,००० | ६२५० | ५६,२५० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १७५९ टँकर ट्रॉली | जळगांव | | | | |
| ६ | एम.ए.ए. /३०८ महेंद्रा जीप | शे. जहीर शेख निजम जफ़रगेट औरंगाबाद. | २०,०००/- | २०,००० | २५०० | २२,५०० |
| ७ | एम.एक्स .व्ही. /५७८४ महिंद्रा ट्रॅक्टर | श्री. इकबाल खॉंन शफ़ी खॉंन औरंगाबाद. | २०,००० /- | ३०,२०० | ३७७५ | ३३,९७५ |
| ८ | एम.एक्स .व्ही. /५४८८महिंद्रा ट्रॅक्टर | श्री. स. खलील स. वजीम औ.बाद | ३०,००० /- | ३४,६०० | ४३२५ | ३८,९२५ |
| ९ | एम.एफ़.यु./९९३० महिंद्रा जीप | श्री. कुमार अभिमन्यु मोरे औ.बाद. | ३५,०००/- | ३६,२०० | ४५२५ | ४०,७२५ |
| १० | एम.एच.२० ई /९१५८ महिंद्रा जीप | श्री. सय्यद अली सय्यद अजेज . सातोना ता. परतूर | ५०,००० /- | ५१,००० | ६३७५ | ५७,३७५ |
| ११ | एम.एच.२० ई /३१०० अँम्बेसिडर कार | श्री. प्रकाश जैस्वाल औ.बाद | ७,०००/- | १६,००० | २००० | १८,००० |
| १२ | एम.एच.२० ई /३२०० अँम्बेसिडर कार | श्री. शेख शफ़ी शेख अजेज औ.बाद | ७,००० /- | १६,५०० | २०६२ | १८,५६२ |
| १३ | एम.एच.२० ई / ९१११ अँम्बेसिडर कार | शकील खॉंन अय्युब खॉंन औ.बाद | ७,००० /- | २८,००० | ३५०० | ३१,५०० |
| १४ | जुने निरूपयोगी टायर्स ७९८ | नासेरखॉंन मुनीरखॉंन औ.बाद | ४१,९३०/- | ७१,००० | ८८७५ | ७९८९५ |
| १५ | जुने भंगार सामान १३.९९ टन | मज्जीत मसूरी श्रीरामपूर जि अहमदनगर | १,११,९२० | २६७२०९ | १०६८८ | २७७८९७ |
| १६ | ऑईलचे रिकामे बॅरल २०० नग | शे. अकील रोहबीब औ.बाद | ४५,०००/- | ६१२०० | ७६५० | ६८८५० |
| १७ | जुने जळालेले ऑईल ५९ नग | इंडोमॅक्स केमीकल इंडस्ट्रीज ज्यपूर | ८८५०० | १,१८,००० | १४७५० | १,३२,७५० |

**वरील एकूण १७ अॅटमसाठी खालीलप्रमाणे किंमत येत आहे.**

१) मनपाने ठरविलेली किंमत रक्कम रू. ५,६३,३५० /-

२) जहीर लिलावात आलेली किंमत रक्कम रू. ९,८३,८०९/-
३) त्यावर वसुल करावयाचा वॅट टॅक्स रू. १,००,६३७/-
४) वॅट टॅक्ससह भरून घ्यावयाची रक्कम रू. १०,८७,४४६ /-

महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या किमतीपेक्षा किंमत जस्त असल्यामुळे सर्व १७ अॅटमकरीता आलेली किंमत वॅट टॅक्स भरून घेवून त्या सर्व अॅटमचा जहीर लिलाव अंतिम करण्यास मंजूरी मिळावी. मा. आयुक्त, मनपा यांनी शिफ़ारस केली आहे. लिलाव समितीस अनेक बोलीदारांनी आम्ही पूर्ण रक्कम भरण्यास तयार आहोत, ताबडतोब डिलीव्हरी द्यावी अशी विनंती केली. त्यावर विचार करून वाहन व यंत्रसामुग्री ज्याचे नांवावर सुटली व त्यांनी पूर्ण रक्कम भरून डिलीव्हरी घेण्याची तयारी दर्शविली तर, त्यांचेकडूनही लेखी अर्ज घेवून व पैसे भरून घेऊन डिलीव्हरी द्यावी असे ठरले. लिलाव समितीचे सदस्य तथा मा. स्थायी समिती सदस्यांनी त्यास मान्यता दिली.

तरी वरीलप्रमाणे एकूण १७ अॅटमसाठी मनपाने ठरविलेल्या किमतीपेक्षा जहीर लिलावांत जस्त किंमत आल्यामुळे व जहीर लिलाव कमिटीमध्ये स्थायी समितीचे ३ सन्माननीय सदस्य व इतर अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयानूसार प्रस्तावास मान्यता देणे योग्य.

**संवाद :**

श्री.जावेद कुरेशी : ट्रॅक्टर, कार, जीप यांची आधारभूत किंमतीपेक्षा जास्त रक्कम आली. ऑईलच्या संदर्भात जेवढे यावयास पाहिजे तेवढे आले नाही. ऑईलचे थांबवून बाकीचे मंजूर करावे.

श्री.संजय शिरसाट : अॅम्बॅसिडर किलोने विकली असती तर किंमत जास्त आली असती.

अति.शहर अभियंता : महानगरपालिकेतर्फे प्रत्येक अॅटममध्ये दर ठरविलेले होते. त्यापेक्षा जास्त रक्कम येते.

मा. सभापती : सदर प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. नवीन चार कार खरेदी संदर्भातील प्रस्ताव अद्याप स्थायी समितीकडे आलेला नाही. तो पुढच्या सभेपर्यंत सादर करावा. संबंधीत अधिकाऱ्यांनी वसुली वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री यांचा जाहीर लिलाव करण्यासाठी गठीत केलेल्या लिलाव समितीच्या उपस्थितीत झालेल्या लिलावानुसार प्रस्तावात नमुद एकूण 17 अॅटमसाठी ठरविलेल्या किंमतीपेक्षा जास्तीची बोली आल्यामुळे सदरील लिलाव बोली अंतीम करण्यास, तसेच लिलावातील बोलीनुसार प्रस्तावात दर्शविण्यात आलेली किंमत, वॅट टॅक्स भरून घेवून संबंधीतांना डिलेव्हरी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.148 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.9 नंदनवन कॉलनी येथे 15 मी. रूंद रस्त्यासाठी फुटपाथ बांधणेच्या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार र.रू.12,80,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात शहरी भागात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू.12,80,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.9 नंदनवन कॉलनी येथे 15 मी. रूंद रस्त्यासाठी फुटपाथ बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,80,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.149 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.81 मध्ये रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरण करणेच्या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार र.रू.14,99,300/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल. तरी रू.14,99,300/- च्या अंदाजपत्रक मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. 81 मध्ये रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.14,99,300/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.150 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा विभाग) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंदनगर, एन-12 या ठिकाणी 300 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव आहे. एन-12 येथील सी, जी, एच व एन-12/डी तसेच एन-12/दिल्लीगेट या सर्व भागाला एन-7 जलकुंभावरून पाणी पुरवठा करण्यात येत असून हे अंतर जवळजवळ तीन कि.मी. आहे. सदर ठिकाणी 200 मीमी सीआय मुख्य जलवाहिनी आहे. एन-12 मधील सर्व सेक्टरमध्ये टप्प्याटप्प्याने पाणी पुरवठा वितरण करण्यात येते. या सर्व भागामध्ये पाणी कमी दाबाने मिळत आहे. करीता सदरील ठिकाणची 200 मीमी व्यासाची मुख्य जलवाहिनी काढून 300 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकावयाची आहे. करीता या कामासाठी महा.जीवन प्राधिकरण यांचे दरसूचीनुसार अंदाजपत्रक र.रू.11,94,560/- चे तयार करण्यात आले असून या कामावर होणारा खर्च अर्थसंकल्प सन 2006-07 मध्ये भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षकात केलेल्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. या कामासाठी मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंद नगर एन-12 येथे 300 मीमी व्यासाची मुख्य डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र.रू.11,94,560/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंदनगर, एन-12 या ठिकाणी 300 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,94,560/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.151 :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-2, वॉर्ड क्र.74 संघर्षनगर येथे 100, 200, 250 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत प्रस्ताव आहे. वॉर्ड क्र.74 एन-2 संघर्षनगर या ठिकाणी जवळजवळ पंधरा वर्षापुर्वी 2" व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आलेली असल्यामुळे जलवाहिनीचा व्यास अत्यंत अपुरा असल्याने पाणी पुरवठा कमी दाबाने होत आहे. सदरील भागात टप्प्याटप्प्याने पाणी पुरवठा वितरण करण्यात येतो, त्यामुळे नागरीकांना कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यामुळे त्या ठिकाणी 2" व्यासाऐवजी 100, 200, 250 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन 2005-06 च्या दरसूचीनुसार र.रू.18,72,909/-चे

अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामासाठी होणरा खर्च हा सन 2006-07 मधील अर्थसंकल्पात भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षकात ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे. या कामासाठी मा.आयुक्तांची शिफारस झालेली आहे.

वॉर्ड क्र.74 एन-2 संघर्षनगर येथे 100, 200, 250 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी र.रू.18,72,909/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.74 एन-2 संघर्षनगर येथे 100, 200, 250 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.18,72,909/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.152 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे नुतनीकरण करणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.15,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन 2006-07 अंतर्गत अर्थसंकल्प पुस्तिका पान क्र.W-58 अ.क्र.1 डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर या लेखा शिर्षाअंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.15,00,000/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे नुतनीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.15,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.153 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नंदनवन कॉलनी येथे बॅडमिंटन हॉल बांधणेकरीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.13,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 अंतर्गत अर्थसंकल्प पुस्तिका पान क्र.W-57 अ.क्र.4 अन्वये 10.00 लक्ष व वळती केलेली तरतुद 3.00 लक्ष व्यापारी संकुले व उर्वरीत इमारती या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे र.रू.13,00,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंदनवन कॉलनी येथे बॅडमिंटन हॉल बांधणेकरीता तयार करण्यात आलेल्या र.रू.13,00,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.154 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.67, वॉर्ड क्र.68 अंतर्गत मो.विष्णूनगर येथील नाल्या लगतची आवश्यक त्या ठिकाणची अतिक्रमणे प्रशासकीय विभागाकडून काढून नाला संरक्षित भिंत बांधणेचे अंदाजपत्रक र.रू.28,99,800/- च्या कामास सर्वसाधारण सभेत ठराव क्र.203/8 दि.18-2-2006 अन्वये मान्यता प्राप्त आहे. यापुर्वी दि.23-2-2006 रोजी सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण प्राप्त पाच निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.गोसावी एस.के. यांची अं.प.दरापेक्षा 21.29% कमी दराची होती. सदर निविदा स्विकृतीचा प्रस्ताव दि.26-4-2006 च्या स्थायी समिती समोर सादर करण्यात आला असता सदर निविदा न

स्विकारण्याचा व फेरनिविदा करण्याचा निर्णय स्थायी समितीने घेतला. या निर्णयानुसार निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेनि/1/06 दि.31-5-2006 नुसार फेरनिविदा बोलविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

1) मे. आदीनाथ कन्ट्रक्शन - 5% कमी दराने
2) मे. ए. एस. कन्स्ट्रक्शन - 4% कमी दराने

उपरोक्त निविदापैकी अं.प.दरापेक्षा 5% कमी दराची निविदा तुलनात्मक दृष्टीने कमी दराची असल्याने मा.आयुक्तांनी मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेसह वाटाघाटी करून 10% कमी दराने काम करण्यास दि.4-10-2006 रोजी शिफारस केलेली आहे. तरी उपरोक्त नुसार 10% कमी दराची निविदा स्विकृतीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.67, वॉर्ड क्र. 68 अंतर्गत मो.विष्णूनगर येथील नाल्या लगतची आवश्यक त्या ठिकाणची अतिक्रमणे प्रशासकीय विभागाकडून काढून नाला संरक्षित भिंत बांधणेचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा 10% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.155 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सध्या देण्यात येत असलेल्या वाहन भत्त्यामध्ये वाढ करणेसाठीचा प्रस्ताव सादर करीत आहे. वारंवार होणाऱ्या इंधन खर्चातील वाढ, पेट्रोल दरातील वाढीमुळे सर्व संबंधीतांना वाहन भत्त्यामध्ये वाढ व्हावी म्हणून सतत मागणी करत आहेत. त्यानुसार मा.स्थायी समितीत वेगवेगळ्या स्वरूपात चर्चा होऊन एकत्रित व सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याच्या दृष्टीने दिलेल्या सूचना व निर्देशानुसार खालील प्रमाणे प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वाहनाचा प्रकार | सद्य:स्थितीत देण्यात येत असलेला प्रतिमाह भत्ता | प्रस्तावित भत्ता (प्रतिमाह) |
|---|---|---|---|---|
| 1 | उप अभियंता | चारचाकी वाहनाकरीता<br>दुचाकी वाहनाकरीता | रू.1800/-<br>रू. 500/- | रू.2500/-<br>रू. 800/- |
| 2 | सहायक अभयंता<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता<br>दुय्यम आवेक्षक | दुचाकी वाहनाकरीता | रू. 500/- | रू. 800/- |

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : सन्माननीय पदाधिकारी यांच्याकडे काम करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना देखील वाहन भत्ता वाढवून देण्यात यावा.

मा. सभापती : या संदर्भात पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी वाहन भत्ता मिळण्यास पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना, इंधन खर्चातील वाढ, पेट्रोल दरातील वाढीमुळे, खालील दरानुसार वाहन भत्त्यामध्ये वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पदनाम | वाहनाचा प्रकार | देय वाहन भत्ता (प्रतिमाह ) |
|---|---|---|---|
| 1 | उप अभियंता | चारचाकी वाहनाकरीता<br>दुचाकी वाहनाकरीता | रू.2500/-<br>रू. 800/- |
| 2 | सहायक अभयंता<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता<br>दुय्यम आवेक्षक | दुचाकी वाहनाकरीता | रू. 800/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.156 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, रेल्वे उड्डाण पुल, रेल्वेस्टेशन रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामासाठी सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात रू.5.00 लक्ष एवढी तरतूद ठेवण्यात आली आहे. सदर रस्ता दुरूस्तीसाठी रू.14,97,777/- एवढा निधी आवश्यक असल्याने दि.13.10.2006 रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.494/6 नुसार वाढीव निधी रू.10 लक्ष उपलब्ध करण्यात आलेला आहे.

तरी रेल्वेस्टेशन उड्डाणपूल रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामाच्या रू.14,97,777/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे उड्डाण पुल, रेल्वेस्टेशन रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,97,777/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाहील व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

**विषय क्र.155 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सध्या देण्यात येत असलेल्या वाहन भत्त्यामध्ये वाढ करणेसाठीचा प्रस्ताव सादर करीत आहे. वारंवार होणाऱ्या इंधन खर्चातील वाढ, पेट्रोल दरातील वाढीमुळे सर्व संबंधीतांना वाहन भत्त्यामध्ये वाढ व्हावी म्हणून सतत मागणी करत आहेत. त्यानुसार मा.स्थायी समितीत वेगवेगळ्या स्वरूपात चर्चा होऊन एकत्रित व सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याच्या दृष्टीने दिलेल्या सूचना व निर्देशानुसार खालील प्रमाणे प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वाहनाचा प्रकार | सद्यःस्थितीत देण्यात येत असलेला प्रतिमाह भत्ता | प्रस्तावित भत्ता (प्रतिमाह) |
|---|---|---|---|---|
| 1 | उप अभियंता | चारचाकी वाहनाकरीता<br>दुचाकी वाहनाकरीता | रू.1800/-<br>रू. 500/- | रू.2500/-<br>रू. 800/- |
| 2 | सहायक अभयंता<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता<br>दुय्यम आवेक्षक | दुचाकी वाहनाकरीता | रू. 500/- | रू. 800/- |

करीता वरील प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : सन्माननीय पदाधिकारी यांच्याकडे काम करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना देखील वाहन भत्ता वाढवून देण्यात यावा.

मा. सभापती : या संदर्भात पुढील सभेत प्रस्ताव ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी वाहन भत्ता मिळण्यास पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना, इंधन खर्चातील वाढ, पेट्रोल दरातील वाढीमुळे, खालील दरानुसार वाहन भत्त्यामध्ये वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पदनाम | वाहनाचा प्रकार | देय वाहन भत्ता (प्रतिमाह ) |
|---|---|---|---|
| 1 | उप अभियंता | चारचाकी वाहनाकरीता<br>दुचाकी वाहनाकरीता | रू.2500/-<br>रू. 800/- |
| 2 | सहायक अभयंता<br>शाखा अभियंता<br>कनिष्ठ अभियंता<br>दुय्यम आवेक्षक | दुचाकी वाहनाकरीता | रू. 800/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
मनपा औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती-स्थायी समिती
मनपा औरंगाबाद